# सामान्य काळातील ३० वा रविवार



## जा, तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे .

# सा.का. ३० वा रविवार - वाचने

**यिर्मया ३१ः ७-९** ः परमेश्वर म्हणतो, “ते ठोकर खाणार नाहीत अशा सरळ मार्गाने मी त्यांस पाण्याच्या प्रवाहाकडे आणीन”.

**इब्री ५ः१-६** ः मलकीसदेकाच्या संप्रदायाप्रमाणे तू युगानुयुग याजक आहेस.

**मार्क १०ः४६-५२** ः येशू त्या आंधळया भिका-याला म्हणाला, “जा, तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे”.

# दूताचा मरियेला संदेश

प्रभूच्या दूताने मरियेला संदेश दिला
आणि ती पवित्र आत्म्याच्या योगाने
गर्भवती झाली
नमो कृपापूर्ण मरिये ... . .



पहा मी प्रभूची दासी आहे
तुझ्या शब्दाप्रमाणे माझ्याठायी होवो
नमो कृपापूर्ण मरिये ... . .

आणि देवशब्द मनुष्य झाला



आणि आम्हामध्ये राहिला

नमो कृपापूर्ण मरिये ... . .

ख्रिस्ताने दिलेल्या वचनास

आम्ही पात्र व्हावे म्हणून

हे पवित्र देवमाते

आम्हासाठी विनंती कर .

## आपण प्रार्थना करू याः



हे प्रभो, तुझ्या पुत्राच्या देह धारणाचा संदेश दूताने आम्हाला दिला. त्याच्या दुःखसहनाच्या व कुसाच्याद्वारे आम्हाला पुनरुत्थानाचे वैभव मिळावे म्हणून आमची मने तुझ्या कृपेने संपन्न कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## प्रवेश गीत

धृ. प्रसन्नतेने प्रभूला स्तवू या
धन्य प्रभूचे कार्य विशाल
नाम तयाचे महान हो
आल्लेलुया आल्लेलुया आलेलु
आलेलु आल्लेलुया

१. आपुल्या लोकी तोची आला
दीन जनांमधी सामील झाला
येऊनी धरती मानव रूपे
सकलजनांचे तारण केले

२. तोची देतो जल धरतीला
उगवुनी तरू अन फल सुमनाला
वचन तयाचे हृदयी घेता
प्रेमदान तो आम्हा देतो

# स्तुती गीत



परम इशाला स्वर्गात गौरव
सज्जनांना देव शांती देवो
आम्ही तव स्तुति करितो रे देवा
धन्यवाद नावा देतो सदा

भजन पुजन करितो रे सेवा
महिमा हो गावा मुखे नीत
प्रभू देवपित्या प्रभो परमेशा
विश्वेशा स्वर्गेशा शक्तीशाली

नमवुनि मान होतो ऋणवंत

तूचि भगवंत थोर जगी

प्रभो जगदिशा प्रभो येशूख्रिस्ता

एकुलत्या सुता गुणवंता



जनकनंदना परेशकोकरा

प्रभो दुःखहरा परमेशा

दयेच्या सागरा जगपापहारी

दया आम्हावरी करी त्वरा



पतितपावना जगपापहारी
प्रार्थना स्वीकारी अनाथांची
बैसला पित्याच्या उजव्या हाताशी
तूचि अविनाशी दया करी

परम पित्याच्या वसे ऐश्वर्यात
परम पवित्र आत्म्यासह
परम पवित्र तूचि प्रभूवर
तूचि एक थोर येशू ख्रिस्त

# प्रतिसाद स्तोत्र

प्रतिसाद ः

परमेश्वराने आमच्यासाठी महत्कृत्ये केली आहेत.

## जयघोष

# आलेलुया, आलेलुया, आलेलुया

# श्रद्धेचे प्रकटीकरण

स्वर्ग आणि पृथ्वी, सर्व दृश्य व अदृश्य वस्तू ह्यांचा उत्पन्नकर्ता एकच परमेश्वर, सर्वशक्तिमान पिता ह्यावर मी श्रध्दा ठेवतो. आणि परमेश्वराचा एकुलता एक पुत्र येशू ख्रिस्त एकच प्रभू ह्यावर मी श्रध्दा ठेवतो. तो सर्व युगांपूर्वी पित्यापासून जन्मलेला आहे. परमेश्वरापासून परमेश्वर, प्रकाशापासून प्रकाश, ख-या परमेश्वरापासून खरा परमेश्वर, तो पित्याशी एकतत्व असून जन्मलेला आहे.उत्पन्न केलेला नाही.त्याजकडून सर्व उत्पन्न झाले

आहे. तो आम्हा मानवांसाठी व आमच्या तारणासाठी स्वर्गातून उतरला. तो पवित्र आत्म्याच्या योगाने कुमारी मरियेपासून शरीर धारण करून मनुष्य झाला. शिवाय आम्हासाठी त्याला कुसी दिले. पोन्ती पिलाताच्या अमदानीत त्याने दुःख भोगले, तो मरण पावला, त्याला पुरले. शास्त्राप्रमाणे तो तिस-या दिवशी पुन्हा जिवंत झाला व स्वर्गात चढला आणि पित्याच्या उजवीकडे बसला आहे आणि जिवंतांचा व मृतांचा न्याय करावयास वैभवाने पुन्हा येणार आहे. त्याचा राज्याचा शेवट होणार

नाही. आणि पवित्र आत्मा, प्रभू व जीवनदाता यावर मी श्रध्दा ठेवतो. तो पिता आणि पुत्र यापासून निघतो आणि पिता व पुत्र यासहित त्याला भजतात व त्याचा गौरव करतात. तो भविष्य वाद्यांमार्फत बोलला आहे. आणि एकाच पवित्र, कॅथलिक व प्रेषितीय ख्रिस्तसभेवर मी श्रध्दा ठेवतो. पापक्षमेसाठी मी एक स्नानसंस्कार मान्य करतो. आणि मेलेल्यांचे पुनरूत्थान व भावी जगातील जीवनाची मी वाट पाहतो. आमेन.

# विश्वासू लोकांच्या प्रार्थना

प्रतिसाद



## प्रभो, आमची प्रार्थना ऐक .

# अर्पण गीत

धृ.अर्पण करितो प्रभु तुला
मम हृदयाचा नजराणा
१.तूच निर्मिले जगत हे सारे
सर्व चराचर अगणित तारे
अखिल भूवरी हुकमत चाले
तुझीच प्रभू हे राणा



२ . तुझीच प्रतिमा मानव केला
परात्पराचा पुत्र हि गणिला
स्तवन करितो सदोदित तव
गाऊन जीवन तराणा

# खिस्तशरीर स्वीकार गीत

धृ. सहर्ष स्वागत प्रभू येशू तव

मम अंतरी तू यावे

रक्त मांस तव देऊन माझे

जीवन पूर्ण करावे



१ .दीन भुकेला आलो दारी

वचन तुझे ऐकण्या

देऊन स्वर्गीय जीवन भाकर

तृप्त प्रभू तू करावे



२ .पामर अंध मी आलो चरणी
शब्द तुझे ऐकण्या
दिव्य प्रकाश देऊनी प्रभूजी
दृष्टीदान करावे
३ .सेवक प्रभू मी आलो सदनी
कृपादान मागण्या
मेंढपाळ तू प्रभूवर माझा
रक्षण सदा करावे



# ख्रिस्तशरीर स्वीकार गीत

धृ. सृष्टी प्रकट रूप तुझे
तरी दिसशी कसा तू ईश्वरा
१. पोसूनी जगी तुची चालवी
कैसे कोठूनि निर्मिशी
परी दिसशी कसा तू ईश्वरा

२ . प्रेमदीप देण्या जगताला

परमेशाने ख्रिस्ताला

धाडियले या जगती याचे

स्मरण असो द्या सर्वाला

# अंतिम गीत

## विश्वास ठेवून

# अंतिम गीत

# आभार तुझे येशू